# आम्ही कोण आहोत

श्रीमाँचा आश्रम आपल्या हृदया इतका विशाल आहे. स्वामी सत्यानंद सरस्वतीं बरोबर श्रीमाँ पूजेची विद्यी आणि त्याचा अर्थ शिकवितात. प्रत्येक घर हे ईश्वराचे मंदिर आहे हा विचार पूजेच्या तांत्रिक परंपरेनुसार आणि ध्यानाद्वारे श्रीमाँ आणि स्वामीजी शिकवितात. आत्मबोध प्राप्ती हे आपले लक्ष मानणाऱ्या जगातील समास्त साधकांनचे घर म्हणजे श्रीमाँचा आश्रम.

गुरू मार्गदर्शणाची प्रेरणा आणि दोषहीन कर्माचे उदाहरण आहे. जेथे ईश्वाराशी संपुर्ण एकरूपता आहे, उत्तम ज्ञान आहे, श्रेष्ठ समज आहे तेथे गुरूची उपस्थिती असते. साधना हे कर्म आदरपूर्ण, ध्यानपूर्वक, निष्कपट वृत्तीने आणि भक्तीने केले जाते.

ज्ञान गुरूपासून शिष्याकडे वाहते. गुरूंच्या शिकवणुकीकडे लक्ष देऊन शिष्य साधना कशी करायची हे शिकतात. गुरूंच्या शिकवणुकीकडे मनापासून लक्ष देणे म्हणजे त्यांचा सन्मान करणे. गुरूंची शिकवण प्रत्यक्ष आचरणात आणणे म्हणजे शिष्याने गुरूंचा केलेला मोठा सन्मान आहे. एकाद्या वस्तुमध्ये संपुर्णतया एकरूप होणे म्हणजेच त्या वस्तुचा सन्मान करणे. गूंरूच्या पावलावर पऊल टाकून त्यांचे श्रध्दायुक्त अंतःकारणाणे अनुसरण करणे हेच शिष्याचे ध्येय असले पाहिजे. असे झाले म्हणजे गुरू कोण आणि शिष्य कोण हे कळेनासे होईल.

चित्त एकाग्र करण्याला ध्यान म्हणतात. साधनेच्या क्षेत्रात नवीन शिष्यांना जाणवू लागते की ध्यान एकाग्र करणे हे दैनिक जीवनाचेच अंग आहे. प्रेम, आदर, पूजा, सेवा आणि ध्यानपूर्वक केलेले कार्य ह्यामुळे आपले जीवन आधिक कार्यक्षम बनते.